मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 27 सप्टेंबर 2025 | पान- 1

# शहरातील दिव्यांग नागरिकांची होणार अचूक नोंद

## दिव्यांग सर्वेक्षणासाठी नुकतेच आशा सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका आणि दिव्यांग भवन यांच्या वतीने शहरातील दिव्यांग नागरिकांची अचूक नोंद घेण्यासाठी व्यापक सर्वेक्षण मोहीम महात्मा गांधी सेवा संघ यांच्या सहकार्याने राबवण्यात येत आहे. आशा सेविकांच्या माध्यमातून हे सर्वेक्षण करण्यात येणार असून या अनुषंगाने नुकतेच आशा सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त ममता शिंदे यांच्या अधिपत्याखाली हे प्रशिक्षण निगडी येथील ग.दि. माडगूळकर सभागृहात पार पडले. याप्रसंगी समाजकल्याण विभागाच्या सहाय्यक आयुक्त निवेदिता घार्गे, सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.अंजली ढोणे, महात्मा गांधी सेवा संघाचे प्रकल्प संचालक विजय कान्हेकर, डॉ. वर्षा गट्टू, डीईआयसी पुणे येथील डॉ. प्रज्ञा गावडे, डॉ. कल्याणी मांडके, दिव्यांग भवनचे मुख्य कार्यकारी अधिकारी परेश गांधी यांच्यासह महापालिकेचा समाज विकास विभाग, दिव्यांग भवन येथील अधिकारी, कर्मचारी तसेच आशा सेविका उपस्थित होत्या.



> “ दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणाचा उद्देश केवळ आकडेवारी गोळा करणे हा नसून त्यांच्या जीवनमानात सुधारणा घडविणे हा आहे. या सर्वेक्षणाच्या माध्यमातून प्रत्येक दिव्यांगापर्यंत शासनाच्या योजना व सुविधा पोहोचतील. समाजातील सर्व घटकांचा विकास होणे महत्त्वाचे असून पिंपरी चिंचवड महापालिका दिव्यांग नागरिकांच्या सशक्तीकरणासाठी असे उपक्रम राबवत आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.**

प्रशिक्षणामध्ये आशा सेविकांना सर्वेक्षणाला गेल्यानंतर दिव्यांग व्यक्तींची ओळख कशी करावी, त्यांच्याशी संवेदनशीलतेने संवाद कसा साधावा, डिजिटल ॲपच्या मदतीने दिव्यांगाची माहिती कशा पद्धतीने नोंदवावी, याबाबत सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. दिव्यांग हक्क कायदा २०१६ नुसार केंद्र शासन, राज्य शासन व स्थानिक प्रशासनाने स्थानिक स्तरावर दर ५ वर्षांनी दिव्यांगांचे सर्वेक्षण करणे गरजेचे आहे. २०१६ च्या कायद्याच्या अगोदर फक्त ७ प्रकारचे दिव्यांगत्व दृष्टिक्षेपात घेतलेले होते. परंतु सद्य परिस्थितीत २०१६ च्या कायद्यानुसार २१ प्रकारचे दिव्यांगत्व निदर्शनास आणलेले आहेत. त्या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींच्या सर्वेक्षणाला गेल्यानंतर त्यांच्या दिव्यांगत्वाचा प्रकार नमूद करण्यासोबतच इतर माहिती कशा पद्धतीने संकलित करण्यात यावी, याची माहितीही यावेळी देण्यात आली.

---

# महापालिकेच्या वतीने जागतिक रेबीज दिनानिमित्त रेबीज लसीकरण सप्ताहाचे आयोजन


## शहरातील श्वानपालकांनी आपल्या श्वानांचे लसीकरण करून घ्यावे; महानगरपालिकेचे आवाहन

**पिंपरी | प्रतिनीधी**

दि.२८ सप्टेंबर हा दिवस सर्वत्र जागतिक रेबीज दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून 'पशुवैद्यकीय विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका' व 'मिशन रेबीज' यांचे संयुक्त विद्यमाने महानगरपालिका हद्दीत दि.२६ सप्टेंबर २०२५ ते ०३ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत रेबीज लसीकरण सप्ताह साजरा करण्यात येत आहे.

या सप्ताहा दरम्यान महानगरपालिकेमार्फत पाळीव श्वानांना पशुवैद्यकीय दवाखाना (नेहरूनगर व निगडी प्राधिकरण) येथे तसेच भटक्या श्वानांना श्वान पथकामार्फत मोफत लसीकरण सुविधा देण्यात येणार आहे. या अनुषंगाने शहरातील श्वानपालकांनी आपल्या श्वानांचे लसीकरण करुन घ्यावे, असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

रेबीज या रोगाबद्दल जनजागृती व रेबीज संसर्गजन्य रोगाचे मुळापासून निर्मुलन करणेकरिता जागतिक रेबीज दिनाच्या निमित्ताने आयुक्त शेखर सिंह यांचे निर्देशानुसार तसेच अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पशुवैद्यकीय विभागामार्फत लसीकरण व जनजागृती मोहिम राबविण्यात येत आहे.



२६ सप्टेंबर २०२५ रोजी महानगरपालिका हद्दीतील मोशी, चिंचवड गाव, रावेत, पुनावळे या ठिकाणी प्रतिनिधित्व स्वरुपात भटक्या श्वानांचे लसीकरण करण्याकरिता पथकांची नियुक्ती करून लसीकरण मोहीम सुरु करण्यात येत आहे. तरी, नागरिक / पशुपालक / प्राणीप्रेमी यांनी जास्तीत जास्त श्वानांचे लसीकरण करणेकरिता सहकार्य करणेचे आवाहन उप आयुक्त संदीप खोत यांनी केले आहे.

# महापालिकेचे फुटपाथवरील झाडांच्या संरक्षणासाठी नियोजन

## मेट्रोचे काम सुरू असल्याने भक्ती-शक्ती ते चिंचवड स्टेशनपर्यंतच्या सेवा रस्त्यावर मोठे खड्डे

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहर हिरवेगार करण्याच्या उद्देशाने पिंपरी चिंचवड महापालिकेने शहरातील प्रमुख रस्त्यांच्या दुभाजकांवर तसेच फुटपाथवर दर दहा मीटर अंतरावर देशी प्रजातींच्या झाडांची लागवड करण्याचा महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या संकल्पनेतून हाती घेण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत झाडांच्या संरक्षणासाठी व्यापक नियोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने झाडांची नियमित देखभाल, निगा व जिओ-फेन्सिंगसह विविध उपाययोजना कशा पद्धतीने करण्यात येत आहेत, याचा आढावा महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी घेतला.



क, फ, ब आणि ड क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील प्रमुख रस्त्यांवरील दुभाजक व फुटपाथवर करण्यात आलेल्या वृक्षारोपणाची प्रत्यक्ष पाहणी अतिरिक्त आयुक्तांनी केली. देशी प्रजातींच्या झाडांची लागवड करण्याचा हाती घेतलेल्या उपक्रमाची अंमलबजावणी व्यवस्थित होत आहे की नाही, याचा आढावा त्यांनी घेतला. याप्रसंगी मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, उद्यान अधीक्षक योगेश वाळुंज, सहाय्यक उद्यान अधीक्षक राजेंद्र वसावे, उद्यान निरीक्षक दादा गोरड, सहाय्यक उद्यान निरीक्षक ज्ञानोबा कांबळे, उद्यान सहाय्यक प्रदीप गजरमल यांच्यासह उद्यान विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

या पाहणीदरम्यान अतिरिक्त आयुक्तांनी नेहरूनगर, संतोषी माता चौक ते यशवंत नगर चौक, टेल्को रोड, स्पाईन रोड, दत्तु तात्या चिंचवडे चौक, वाल्हेकर वाडी – ८० फुटी रस्ता, बिर्ला हॉस्पिटल रोड, चिंचवड, काळेवाडी बीआरटी रोड, कावेरी नगर, कसपटे वस्ती, वाकड परिसरातील प्रमुख रस्ते अशा विविध भागांची पाहणी करत झाडांच्या देखरेखीबाबत व निगेबाबत विविध निर्देश दिले.

रस्त्यांच्या दुभाजकांवर झाडे लावताना दोन झाडांच्या मध्ये नियमापेक्षा जास्त गॅप ठेवू नये, झाडांची कटिंग एका रेषेत करावी, झाडांभोवती प्लास्टिक वा कचरा दिसणार नाही याची काळजी घ्यावी, झाडांच्या संरक्षणाच्या दृष्टीने त्यांना बांबू ट्री गार्ड लावावे, झाडांना नियमित पाणी द्यावे, झाडांच्या मध्ये 'तन' राहू नये, फांद्यांची छाटणी नियोजनबद्ध असावी, अशा सूचना देतानाच रस्त्याच्या कडेला असणारे आयलंड्स स्वच्छ करून त्यांनाही हरित करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

रस्ता दुभाजक व फुटपाथवर झालेल्या वृक्षारोपणाचा दर्जा, झाडांची संख्या आणि जिओ-फेन्सिंग याबाबत त्यांनी उद्यान विभागाच्या अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. यावेळी त्यांनी वारंवार सूचना देऊनही निर्देशांचे पालन न करणाऱ्या व कामामध्ये हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदारांवर दंडात्मक कारवाई करण्याचे निर्देश दिले. तसेच प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने या कामाचा नियमित आढावा घ्यावा, असेही त्यांनी स्पष्ट केले. महापालिकेच्या देशी प्रजातींच्या वृक्षारोपण मोहिमेमुळे शहराच्या हरित आच्छादनात वाढ होईल, प्रदूषण नियंत्रणात राहील व पर्यावरणस्नेही शहरनिर्मितीस मदत होईल, असा विश्वास अतिरिक्त आयुक्तांनी व्यक्त केला.

### शहीद अशोक कामटे उद्यानाला दिली भेट..

» अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांनी वाकड परिसरातील शहीद अशोक कामटे उद्यानाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी उद्यानातील खुले व्यासपीठ, सुरक्षाव्यवस्था, स्वच्छतागृह आदींबाबत माहिती घेतली. येथील झाडांवर नियमित फवारणी करावी, झाडांना नियमित पाणी द्यावे, उद्यानात आवश्यकतेनुसार आणखी विद्युत दिवे बसवण्यात यावेत, अशा विविध सूचनाही त्यांनी दिल्या.

# पिंपरी-चिंचवड भाजपातर्फे पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती साजरी

## शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे व आमदार अमित गोरखे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती पिंपरी-चिंचवड शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. मोरवाडी येथील भाजप मध्यवर्ती कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या मुख्य कार्यक्रमात शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे व आमदार अमितजी गोरखे यांच्यासह अनेक प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि दीप प्रज्वलन करून करण्यात आली.

यावेळी बोलताना शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे यांनी पंडितजींच्या कार्याचा गौरव केला. "पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेले 'एकात्म मानववाद' हे तत्त्वज्ञान आजही आपल्याला दिशादर्शक आहे. समाजातील प्रत्येक घटकाचा आणि विशेषतः शेवटच्या व्यक्तीचा विकास हेच त्यांचे उद्दिष्ट होते. त्याच विचारांवर चालत आज भाजप 'सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास' या धोरणाने काम करत आहे," असे ते म्हणाले.

या सोहळ्याव्यतिरिक्त, भाजपाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी आपापल्या निवासस्थानी, संपर्क कार्यालयांमध्ये आणि बुथवर पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पिंपरी-चिंचवड भाजप शहर जिल्हा पदाधिकाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.



यावेळी शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापु) काटे, आमदार अमित गोरखे, संगठन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस वैशाली खाड्ये, मधुकर बच्चे, नगरसेवक शैलेश मोरे, सुरेश भोईर, युवा मोर्चा अध्यक्ष दिनेश यादव, राजेंद्र बाबर, कोषाध्यक्ष हेमचंद्र मासुळकर, विजय शिनकर, कैलास सानप, गणेश ढाकणे, सलीम शिकलगार, अरुण थोरात, शिवदास हांडे, सीमा बोरसे, सीमा चव्हाण, रवींद्र देशपांडे, नंदूभाऊ भोगले, अतुल इनामदार, गणेश वाळुंजकर, मंडलाध्यक्ष अनिता वाळुंजकर, खंडूदेव कठारे, प्रीतीसिंह परदेशी, गोरख कुंभार, किरण वाल्हेकर, अभिजित बोरसे, सचिन कुलकर्णी तसेच संपूर्ण भारतीय जनता पार्टी मधील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरणाला गती

## मुंढवा, कोरेगाव पार्क, संगमवाडीतील 22.26 हेक्टर जागा नदी प्रकल्पात समाविष्ट

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेच्या महत्त्वाकांक्षी मुळा-मुठा नदीकाठ सुशोभीकरण प्रकल्पातील भूसंपादनाचा असलेला मोठा अडथळा आता दूर झाला आहे. मुंढवा येथील महिला व बालकल्याण विभाग, संगमवाडीतील संरक्षण खाते आणि कोरेगाव पार्क येथील वन विभाग यांच्या एकूण 22.26 हेक्टर जागांचे भूसंपादन करण्यास हिरवा कंदील मिळाला आहे. विशेष म्हणजे, संरक्षण खात्यानेही परवानगी दिल्याने या प्रकल्पाला गती मिळणार आहे.



> नदीकाठ सुधार प्रकल्पातील एका टप्प्याचे काम पीपीपी तत्त्वावर सुरू आहे. मात्र आवश्यक जागांचे भूसंपादन न झाल्याने कामाला संथगती होती. लवकरात लवकर भूसंपादन पूर्ण करून प्रकल्प गतिमान करण्यासाठी महापालिका प्रयत्नशील आहे.
>
> **- नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका.**

शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नदीकाठाच्या 44.4 किलोमीटर परिसराचा विकास करण्यासाठी हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. केंद्र व राज्य सरकारच्या मालकीच्या जागा या प्रकल्पासाठी आवश्यक असून, त्यांचे भूसंपादन करण्यासाठी महापालिकेकडून गेल्या काही महिन्यांपासून पाठपुरावा सुरू होता.

गुरुवारी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत या संदर्भातील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., शहर अभियंता प्रशांत वाघमारे, प्रकल्प विभागप्रमुख दिनकर गोजारे आणि कार्यकारी अभियंता बिपिन शिंदे उपस्थित होते.

'संगमवाडी भागातील संरक्षण खात्याची सुमारे 7 हेक्टर जागा या प्रकल्पासाठी महत्त्वाची असून, तेथे प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली आहे. या जागेबदल्यात महापालिका संरक्षण विभागासाठी 32 कोटींची कामे करून देणार असून, त्याबाबतचा सामंजस्य करार पुढील आठवड्यात होणार आहे.

दरम्यान, मुंढवा परिसरातील महिला व बालविकास विभागाची 3.4 हेक्टर जागा तसेच कोरेगाव पार्कमधील वन विभागाची 11 हेक्टर जागाही या प्रकल्पात समाविष्ट केली जाणार आहे. या सर्व जागांचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया वेगाने पूर्ण होईल,' असे शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी सांगितले.

# सुसंस्कृत राजकारण करा, पक्षात कुणीही वाईट विधाने करू नका

## ..तर आपल्यावर पांघरून घालायला साहेब असायचे; अजित पवारांचं विधान

**पुणे | प्रतिनिधी**

मागचा अजित पवार आणि आताच्या अजित पवारमध्ये खूप फरक पडला आहे.जस वय वाढत, तस आपल्याला बदलाव लागत, तशी मॅच्युरिटी येते, आपणपूर्वी काही केलं, तर आपल्यावर पांघरून घालायला साहेब असायचे, पण आता आपल्यालाच पांघरून घालायच आहे असे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष आण उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले. पक्षात कुणीही वाईट विधाने करू नका.कुणी काही वक्तव्य करतात ते वाईट बोलले म्हणून आपण वाईट पद्धतीने उत्तर द्यायचं ही आपली शिकवण नाही. राजकारण सुसंस्कृतपणाने करण्याचा विचार जपा. लोक काही बोलतील तर विनाशकाले विपरीत बुद्धी म्हणा आणि पुढे निघून जा, महत्व देऊ नका असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीमध्ये पुणे जिल्हा परिषदचे माजी अध्यक्ष, भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष जालिंदर कामठे आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेते, जिल्हा भूविकास बँकेचे माजी संचालक मुरलीधर निंबाळकर, काँग्रेस पक्षाचे नेते रोहन सुरवसे पाटील, शरद पवार गटाच्या नेत्या स्वाती चिटणीस यासह अनेक नेत्यांचा पक्ष प्रवेश झाला.

अजित पवार म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये आज ज्या मंडळींचा प्रवेश झाला आहे.त्या सर्वांनी यापुढील काळात एकत्रित काम करायच आहे. आपल्या प्रत्येकाला एकमेकांचे स्वभाव, काम करण्याची पद्धत आणि मत देखील माहिती आहे. पण अजित पवाराला भेटावं की नाही. त्याचा मूड आहे की नाही, हे जालिंदरला चांगलाच माहिती आहे. राष्ट्रवादीचा कार्यकर्ता म्हणून तुम्ही इकडे तिकडे काही बोललात की त्याचा परिणाम पक्षावर होतो. महाराष्ट्रातल्या कार्यकर्त्यांना सांगत आहे की सुसंस्कृतपणाने बोला. ज्याला आपण पक्षात घेत आहोत त्याची प्रतिमा जनमाणसात चांगली असली पाहिजे. त्याच्यावर चुकीचे आरोप किंवा चुकीचे केसेस नसावेत. लोकांकडे जाताना आपल्याला विश्वासाने जाता यायला पाहिजे असेही अजित पवार यांनी सांगितले.



### मला चुलता पुतण्याचं नको सांगू

» भाजपचे नेते जालिंदर कामठे यांचा पक्ष प्रवेश झाल्यानंतर अजित पवार भाषण करतेवेळी व्यासपीठाकडे पाहत म्हणाले, राकेश कामठे कुठ आहे.तू काही मनाला लावून घेऊ नकोस, कामठे कामठे भावकी एकत्र आलेली आहे. त्याच वेळी खालून एक कार्यकर्ता म्हणाला, चुलत्या पुतण्याच नात आहे. त्यावर अजित पवार म्हणाले, चुलता पुतण्याचं तू मला नको सांगू मागच्या पिढीच नको सांगू आणि आताच्या ही पिढीच नको सांगू, आणि पुढच्या पिढीच देखील नको सांगू, असे म्हणताच उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

# पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनाची मुदत संपुष्टात

## आठवडाभराची मुदत देण्यात आल्याने पुन्हा मुदतवाढ न देण्याचा जिल्हा प्रशासनाचा निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या भूसंपादनासाठी संमतिपत्रे देण्याची मुदत गुरुवारी (२५ सप्टेंबर) संपुष्टात आली. यापूर्वी संमतिपत्रे देण्यासाठी आठवडाभराची मुदत देण्यात आल्याने पुन्हा मुदतवाढ न देण्याचा निर्णय जिल्हा प्रशासनाने घेतला आहे. त्यामुळे शुक्रवारपासून (२६ सप्टेंबर) जमिनीच्या मोजणी प्रक्रियेला प्रारंभ होणार आहे.

पुरंदर विमानतळासाठी पारगाव, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी, उदाचीवाडी आणि वनपुरी अशा सात गावांमधून जमीन संपादित होणार आहे. विमानतळाला होणाऱ्या विरोधामुळे राज्य सरकारने साडेसातऐवजी तीन हजार एकर जमीन संपादित करण्याचा निर्णय गेल्या महिन्यात घेतला होता. त्यानुसार सहमती संमतिपत्रे देण्यासाठी १८ सप्टेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. या कालावधीत २ हजार ८०० शेतकऱ्यांनी सुमारे २ हजार ७०० एकर जमीन देण्याची संमती दिली. त्यानंतर संमतिपत्रे देण्यासाठी गुरुवारपर्यंत (२५ सप्टेंबर) मुदतवाढ देण्यात आली. या कालावधीत ३ हजार २२० शेतकऱ्यांनी २ हजार ८१० एकर जागेचे संपादन करण्यासंदर्भातील संमतिपत्रे सादर केल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.

विमानतळासाठी सुमारे तीन हजार एकर जमीन घेण्याचे नियोजन आहे. मोजणीप्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दरनिवाडा निश्चित करून शेतकऱ्यांना देण्यात येणारा मोबदला आणि परताव्याबाबत सरकारकडे प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर थेट भूसंपादनाची प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. पुरंदर तालुक्यातील सातही गावांमध्ये सरकारच्या मालकीची सुमारे २०० एकर जमीन उपलब्ध आहे.



> विमानतळाच्या भूसंपादनासाठी संमतिपत्रे देण्याची मुदत संपुष्टात आली आहे. त्यानुसार २ हजार ८१० एकर जागा लवकरच ताब्यात येणार आहे. संमतिपत्रे देण्यास मुदतवाढ देण्यात येणार नाही. शुक्रवारपासून जमिनीच्या मोजणीला प्रारंभ होईल.
>
> **- जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी.**

# चाकणमध्ये वाहतूक कोंडीविरोधात जनआंदोलनाची तयारी

## उद्योजक आणि नागरिकांकडून 'पीएमआरडीए'ला धडक मोर्चाचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

चाकण परिसरातील दीर्घकाळ सुरू असलेल्या वाहतूक कोंडी आणि खराब रस्त्यांमुळे स्थानिक नागरिक, तसेच औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक वैतागले आहेत. "आम्हाला आता फक्त आश्वासने नकोत, कृती हवी आहे," असे स्पष्ट करत ट्रॅफिकमुक्त चाकण कृती समिती आणि चाकण औद्योगिक क्षेत्रातील सुमारे दोनशे कंपन्यांच्या प्रतिनिधींनी गुरुवारी (दि. २५) आयोजित केलेल्या महाबैठकीत राज्य सरकार आणि प्रशासनाला कडक इशारा दिला आहे.




रस्ते विकास आणि वाहतूक कोंडीवर तातडीने उपाययोजना न केल्यास 'पीएमआरडीए' कार्यालयावर प्रत्येक कंपनीतील कामगार, अधिकारी तसेच हजारो स्थानिक नागरिक पायी धडक मोर्चा काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हा मोर्चा केवळ निदर्शन नसून, "काम केले नाही तर आम्ही शांत बसणार नाही," असा जनतेचा इशारा असेल, असे समितीच्या पदाधिकाऱ्यांनी जाहीर केले.

चाकण हे पुणे जिल्ह्यातील प्रमुख औद्योगिक केंद्र असून, येथे हजारो कंपन्या आणि लाखो कामगार कार्यरत आहेत. मात्र, मागील वीस वर्षांपासून सुरू असलेल्या वाहतूक कोंडीने येथील जीवनमान ठप्प झाले आहे. खराब रस्ते, बेसुमार खड्डे आणि एमआयडीसी भागातील दीर्घकाळ सुरू असलेली दुरुस्तीकामे यामुळे दैनंदिन जीवनात अडथळे येत आहेत. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी यापूर्वीही निषेध आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पहाटे चाकणचा दौरा करून अतिक्रमणे हटवण्याची कारवाई केली. मात्र, त्यानंतर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आला नाही. परिणामी, उद्योजक आणि नागरिकांमध्ये असंतोष वाढला असून, आजच्या महाबैठकीत जनआंदोलनाची तयारी करण्यात आली.

चाकण एमआयडीसी आणि पंचक्रोशीतील नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास सतत भोगावा लागत आहे. 'पीएमआरडीए', 'एनएचएआय', 'एमएसआयडीसी', 'एमएसईबी' आणि 'पीडब्लूडी' केवळ फाइल हलवण्यात गुंतल्या आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'पीएमआरडीए'ला पालकत्व दिले असले, तरी या संस्थेने अद्याप ठोस पावले उचललेली नाहीत. विकास योजना (DP PLAN)मधील रस्ते केवळ कागदावरच राहिले असून, प्रत्यक्ष अंमलबजावणी झालेली नाही. औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांचे जाळे, फ्लायओव्हर, बायपास आणि पर्यायी मार्गांच्या विलंबामुळे उद्योगांचे आर्थिक नुकसान होत आहे. कामगारांची दैनंदिन हालअपेष्टा होत असून, अपघातांमध्ये अनेकांनी प्राण गमावले आहेत. "या समस्यांमुळे आमचे उत्पादन आणि आर्थिक चक्र धोक्यात आले आहे," असे एका उद्योजक प्रतिनिधीने सांगितले.

### अतिक्रमण काढूनही प्रगती नाही

» गेल्या काही आठवड्यांत 'पीएमआरडीए'ने चाकण-तळेगाव भागात अतिक्रमण निर्मूलन मोहीम राबवली असून, २३१ हून अधिक अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणे हटवली आहेत. यात पुणे-नाशिक महामार्ग आणि तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गावरील १५० हून अधिक अतिक्रमणे काढण्यात आली आहेत, ज्यामुळे रस्त्यांची रुंदी वाढली आहे. तसेच, तळेगाव-चाकण-शिक्रापूर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डीच्या दुरुस्ती आणि रुंदीकरणासाठी ५९.७५ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता मिळाली असून, यामुळे वाहतूक कोंडी कमी होण्याची अपेक्षा आहे. तरीही, या कारवायांनंतरही ठोस प्रगती दिसत नसल्याने आजच्या बैठकीत आंदोलनाचा ठराव मंजूर करण्यात आला.